# सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- १४४ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● शुक्रवार १८ जुलै २०२५


## 'विधानभवनात मलाच मारण्यासाठी आले'

## जितेंद्र आव्हाड कडाडले; पडळकरांनीच हल्ला केल्याचा दावा



**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

मुंबई : भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे नेते तथा माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यातील वाद चांगलाच विकोपाला गेला आहे. आव्हाडांनी दिलेल्या मंगळसूत्र चोर या घोषणेनंतर त्यांचा पडळकर यांच्या सोबतचा वाद वाढला होता. त्यानंतर आता विधान भवनाच्या लॉबी मध्येच पडळकर आणि आव्हाड यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर जितेंद्र आव्हाड चांगलेच संतापले आहेत. विधिमंडळातच आमदार सुरक्षित नाहीत. असं असेल तर आमदार कशाला राहायचं? असा संतप्त सवाल त्यांनी केलाय. अख्ख्या महाराष्ट्राला समजलं आहे की पडळकरांच्या लोकांनी हल्ला केला आहे. आम्हाला यापेक्षा जास्त कोणताही पुरावा द्यायचा नाही. तुम्ही विधानपरिषदेत गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते आमच्यावर हल्ले करत असतील तर आम्ही सुरक्षित नाहीयोत, असा त्याचा अर्थ होतो, असा जळजळीत सवाल त्यांनी केला. तसेच मी सुरक्षित नसल्याचे ट्वीट अगोदरच केलेले आहे. मला आई-बहिणीवर शिव्या देण्यात आल्या. तुला मारून टाकू अशी धमकी देण्यात आली. कुत्रा, डुक्कर असं काहीही बोलण्यात आलं, असा गंभीर आरोपही आव्हाड यांनी केलाय. विधानसभेत नेमकं काय चालू आहे? मी भाषण करून बाहेर आलो होतो. थोडी मोकळी हवा घेण्यासाठी बाहेर आलो होते. हे गुंड मलाच मारण्यासाठी आले होते. म्हणजे विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यावर आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार. आमचा गुन्हा काय? असाही प्रश्न आव्हाड यांनी केलाय. कोणीतरी मवाल्यासारखा येतो आणि आई - बहिणीवरून शिव्या देतो तर अशा भाषेला अधिकृत भाषा म्हणून जाहीर कारा ना. सत्तेचा एवढा माज चढला आहे, अशी कठोर टीका आव्हाड यांनी सत्ताधाऱ्यांवर केली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाची दखल विरोधकांनी घेतली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाची दखल विरोधकांनी घेतली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. विधिमंडळाच्या बाहेर अशा घटना आणि विधिमंडळाच्या प्रांगणात हे प्रकार घडणे यात फरक आहे. हे गुंड विधानभवनात आलेच कसे? त्यांना पास कसा मिळाला? त्यांना पास देणारा आमदार कोण? याबाबत चौकशी झाली पाहिजे? अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

### नेमकं काय म्हणाले आव्हाड?

विधानभवन परिसरात माध्यमांशी संवाद साधताना जितेंद्र आव्हाड संतप्त सुरात आव्हाड म्हणाले, 'हल्ला कोणी केला... बोला ना पडळकरांनी केला, कशाला प्रश्न विचारताय? अख्ख्या महाराष्ट्राला समजलं हल्ला कोणी केला. तुम्ही विधानभवनात गुंडांना प्रवेश देणार असाल, तर आमचे जीव सुरक्षित नाही आहेत. आई बहिणीवरुन शिव्या दिल्या. मारून टाकण्याची धमकी दिली.'आव्हाड पुढे म्हणाले, मी भाषण झाल्यावर मोकळी हवा घेण्यासाठी बाहेर आलो होतो, हे मलाच मारण्यासाठी आले होते. विधीमंडळाच्या पाय-यांवर आणि भवनामध्ये आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार? काय गुन्हा आहे आमचा? असा संतप्त सवाल आव्हाडांनी उपस्थित केला.विधानभवन परिसरात शिव्या दिल्या जातात, असंसदीय शब्द वापरले जातात, आता करुन टाका शिव्यांना पण संसदीय शब्द. सत्तेचा एवढा माज का...
असे म्हणत जितेंद्र आव्हाड कडाडले.

कोणीतरी मवाल्यासारखा येतो आणि आई-बहिणीवरुन शिव्या देतो तर अशा भाषेला अधिकृत भाषा म्हणून जाहीर कारा ना. सतेचा एवढा माज चढला आहे, अशी कठोर टीका आव्हाड यांनी सत्ताधा-यांवर केली आहे.

## तुफान मारामारी, शर्ट फाडलं,

## आव्हाड-पडळकर कार्यकर्ता हाणामारीनंतर फडणवीस ॲक्शन मोडवर!



**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

मुंबई : राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे आमदार तथा माजी मंत्री जितेंद्र आव्हाड आणि भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांत विधान भवनातच जोरदार हाणामारी झाली आहे. विशेष म्हणजे विधान भवनात मला मारण्या साठीच गुंड आणण्यात आले होते, असा गंभीर आरोप आव्हाड यांनी केला आहे. विधानभवनात झालेल्या या हाणामारीचे प्रकरण चांगलेच तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून या प्रकरण कडक कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका घेतली आहे. नेमकं काय घडलं होतं? आज विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना विधान भवनाच्या परिसरात आव्हाड आणि पडळकर यांचे कार्यकर्ते समोरासमोर आले. यावेळी आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांना मारहाण करण्यात आली. तसेच त्यांना शिवीगाळही झाली. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. दरम्यान ही घटना घडल्यानंतर आव्हाड यांनी संताप व्यक्त केला आहे. विधिमंडळात आमदार सुरक्षित नसतील तर गंभीर बाब आहे, असं ते म्हणालेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी, अशी मागणी केली. दरम्यान, कार्यकर्त्यांत हाणामारी झाल्यानंतर आव्हाड यांनी हा प्रकार मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याही कानावर घातला आहे. तसेच विधानसभा अध्यक्षांनाही या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आता फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन कारवाई केली पाहिजे, अशी भूमिका घेतल्यानंतर विधान सभा अध्यक्ष नेमकं काय करणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

> देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?
>
> घडलेली घटना ही अतिशय चुकीची आहे. विधानभवनात अशा प्रकारची घटना घडणे योग्य नाही. विधानसभेचे अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती यांच्या अंतर्गत विधानभवनाचा परिसर येतो. त्यामुळे या दोघांनीही घडलेल्या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच यावर कडक कारवाई करावी अशी विनंती मी त्यांना केल्याचेही त्यांनी माध्यमांना सांगितले.विधानभवनाच्या परिसरात लोक मोठ्या प्रमाणात जमा होतात आणि मारामारी करतात हे विधानभवनाला शोभणारे नाही. म्हणूनच यावर निश्चित कारवाई ही झालीच पाहिजे, अशी भूमिकाही यावेळी फडणवीस यांनी स्पष्ट केली.

## फडणवीस आणि ठाकरेंमध्ये अर्धा तास बैठक

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



मुंबई : राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे हे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनामध्ये ही महत्त्वाची बैठक पार पडली आहे. बुधवारी देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निरोपसमारंभाप्रसंगी जोरदार टोलेबाजी केल्याचं पाहायला मिळालं होतं. फडणवीस यांनी यावेळी विधानभवनात बोलताना उद्धव ठाकरे यांना थेट सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण दिलं. तुम्हाला इकडे स्कोप आहे, तुम्ही येऊ शकता, असं त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान फडणवीसांच्या या ऑफरनंतर आज उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची बैठक पार पडल्यानं राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलंच उधाण आल्याचं पाहायला मिळालं.आज उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, या भेटीला आदित्य ठाकरे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांना 'हिंदीची सक्ती हवीच कशाला' हे पुस्कत देखील भेट दिलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार विरोधी पक्ष नेतेपद, त्रिभाषा सूत्र आणि हिंदीसक्ती या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली आहे. दरम्यान दुसरीकडे आजच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे देखील उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. अंबादास दानवे यांच्या कार्यालयात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष उद्धव ठाकरेंच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. जनसुरक्षा विधेयकाबाबतीत महा विकास आघाडी राज्यपालांची भेट घेण्याचे नियोजन करत असून, याबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि काँग्रेसचे नेते उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. दरम्यान दुसरीकडे मुंबईत विजयी मेळावा पार पडल्यानंतर शिवेसना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मसने प्रमुख राज ठाकरे यांच्या युतीसंदर्भात देखील जोरदार चर्चा सुरू आहे, मात्र युतीसंदर्भात राज ठाकरे हे सावध भूमिका घेत असल्याचं पाहायला मिळत आहे.

## 'दोन लाख दे नाहीतर मंत्राद्वारे तुला बकरी करेन';

## भोंदूबाबाची महिलेला धमकी, पुण्यातील खळबळजनक घटना

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



पुणे : आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी उपाय करून सोन्याचा गुप्त खजिना मिळवून देतो, असे आमिष दाखवून महिलेची फसवणूक झाल्याची घटना शहरातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरात घडली आहे. याप्रकरणी कोरेगाव पार्कपोलिसांनी सापळा रचून एका भोंदूबाबाला बेड्या ठोकल्या आहेत. खानबाबा उर्फ मदारी महंमद खान (६५, रा. मदारी वस्ती, कोरेगाव पार्क) असे या भोंदूबाबाचे नाव आहे. महिलेकडून पैसे उकळ्यानंतर तिला फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, आरोपीने 'याबाबत कोणाला सांगितल्यास मंत्राद्वारे तुला बकरी करेन' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. फिर्यादी महिला विधवा असून त्यांना दोन मुले आहेत. घरची आर्थिक चणचण दूर व्हावी, असे तिला वाटत होते. ही बाब मदारी बाबासमोर महिलेने बोलून दाखवल्यानंतर त्याने आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी उपाय करून सोन्याचा गुप्त खजिना मिळवून देतो, असे आमिष दाखवले. त्यासाठी पूजेसाठी भोंदूने महिलेकडून दोन लाख ६० हजार रुपये घेतले. पंधरा दिवसांपूर्वी त्याने आपल्या घरी पूजा मांडून फिर्यादी महिलेस एक मातीचे मडके व त्यावर काळ्या रंगाचे कापड बांधून दिले, तसेच ते कापड १७ दिवसांनी रात्री ११ वाजून २१ मिनिटांनी उघडण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादी महिलेने मडक्यावरील कापड काढले असता, त्यात काहीच आढळले नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने मदारीला फोन केला, तेव्हा त्याने याबाबत कोणाला सांगितले तर तुला मंत्राद्वारे बकरी करेन अशी धमकी दिली. त्यानंतर महिलेने घडलेल्या प्रकाराबाबत पोलिसांना कळवले. मदारीने फिर्यादी महिलेला मंगळवारी (दि. १५) सायंकाळी साडेसात वाजता घरी बोलवले, त्यावेळी पोलिसांनी सापळा लावून मदारीला ताब्यात घेतले. दरम्यान, आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १९ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

## राज्याच्या राजकारणात खळबळ,

## हनी ट्रॅपप्रकरणी अधिकाऱ्यांनी उचललं मोठं पाऊल

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



मुंबई : सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात एका मोठ्या हनी ट्रॅप प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. राज्यातील तब्बल ७२ वरिष्ठ अधिकारी आणि काही आजी-माजी मंत्री 'हनी ट्रॅप'मध्ये अडकल्याची शक्यता वर्तवली जात होती. नाशिक दौऱ्यावर असलेल्या राज्यातील एका बड्या नेत्याने अनौपचारिक गप्पां दरम्यान हा गौप्यस्फोट केला जात होता. आता या प्रकरणी एक नवीन माहिती समोर आली आहे. नाशिकसह राज्यातील अनेक प्रमुख शहरांमध्ये सध्या एका मोठ्या हनी ट्रॅप प्रकरणाची गुप्त चौकशी सुरु आहे. यामुळे प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राज्यातील ७२ हून अधिक अधिकारी आणि काही माजी मंत्री या हनी ट्रॅपमध्ये अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्याच्या राज कारणात आणि प्रशासनात मोठे पडसाद उमटत आहेत. हनी ट्रॅपमध्ये अडकलेल्या काही संशयित अधिकाऱ्यांनी तातडीने आपले मोबाईल फोन फॉर्मेट केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच, या प्रकरणात अडकलेले काही अधिकारी आणि राजकीय व्यक्तींनी आपले संबंध लपवण्यासाठी तसेच माहिती दडवण्या साठी परस्परांमध्ये समन्वय साधल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.या प्रकरणाची सध्या गुप्त पद्धतीने चौकशी सुरु आहे. या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे. यात संशयित व्यक्तींचे व्हिडिओ कॉल्स, हॉटेलमधील भेटी आणि मोठे आर्थिक व्यवहार यांचे पुरावे तपास यंत्रणांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेता अनेक बड्या व्यक्तींनी 'तेरी भी चुप, मेरी भी चुप' या तत्वावर मौन बाळगले आहे. त्यामुळे हे प्रकरणं गभीर असल्याचे बोललं जात आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. यात अनेक बड्या नेत्यांची नावे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या गुप्त चौकशीतून नेमकं काय बाहेर येतं, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## दोस्त दोस्त ना रहा! मित्रानेच रचला मित्राचे ४० लाख लुटण्याचा कट,

## २४ तासाच्या आत लागला गुन्ह्याचा छडा!

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

पुणे : धाराशिव येथून स्टिल व्यावसायिक मित्रासोबत शहरात आलेल्या मित्रानेच त्याच्या कडील ४० लाखांची रोकड लुटण्याचा प्रयत्न केला. आंबेगाव पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल होताच चोवीस तासाच्या आत पोलिसांनी आरोपी मित्रासह त्याच्या साथीदारांना अटक केली. तीन आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त मुलाला यावेळी पोलिसांनी ताब्यात घेतले. पैशांच्या मोहापायी व्यावसायिकाच्या मित्रानेच हे कृत्य आपल्या अन्य साथीदारांसह केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. मित्राचे पैसे लुटण्यासाठी मित्र त्याचा पाठलाग करत थेट पुण्यात आला होता. मंगेश दिलीप ढोणे (३२, रा. रामलिंगनगर, येडशी, जि. धाराशिव) असे या लुटारू मित्राचे नाव आहे. त्याच्यासह पोलिसांनी प्रदीप रामदास डोईफोडे (३५, रा. इंगळेनगर, भुगाव) याला अटक केली आहे. तसेच एका अल्पवयीनाला ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी अभिजित विष्णू पवार (३२, रा. रामलिंगनगर, येडशी, जि. धाराशिव) यांनी आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी तिन अज्ञात चोरट्यां



विरोधात गुन्हा दाखल केला होता. मंगळवारी (दि. १५) सकाळी पावणे नऊच्या सुमारास आंबेगाव मधील बाबजी पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर पवार आणि त्यांचा मित्र ढोणे रस्त्याने पायी चालत निघाले होते. त्या वेळी ढोणेच्या खांद्यावर असलेली ४० लाख रोख रकमेची बॅग चोरट्यांनी पळवली. हा सर्व लुटीचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झाला होता.व्यावसायिकाच्या मित्रानेच आपल्या अन्य साथिदारांसोबत मिळून, पैसे असलेली बॅग लंपास केली होती. आत्तापर्यंत पोलिसांनी दोघांना अटक केली असून, एका विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. अन्य काही आरोपी फरार असून, आम्ही त्यांचा शोध घेत आहेत.- शरद झिने, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, आंबेगाव पोलिस ठाणे.ही कामगिरी, पोलिस उपायुक्त मिलिंद मोहीते, निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक विजय कुंभार, अंजुम बागवान, आंबेगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने, पोलिस निरीक्षक (गुन्हे) गजानन चोरमले, सहायक निरीक्षक अमोल रसाळ, अशिष कवठेकर, उपनिरीक्षक मोहन कळमकर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी केली.

# अग्रलेख

## दहीभात...!

पुण्यात कुणाकडे कधीतरी दही-बुत्ती हा दहीभाताचा प्रकार ताटात पडला. दही-बुत्ती हे मूळचे दाक्षिणात्य अपत्य असले तरी पुण्यातल्या घरी वास्तव्यास आल्यामुळे साहजिकच "गोऽऽड" झाले होते. पण "यजमान-दाक्षिण्य" दाखवून मी तो भात गोड (न) मानून कसातरी गिळला. एरवी पित्तशामक असणारा दहीभात, पित्त खवळायलाही कारणीभूत ठरू शकतो हे तो साखर पेरलेला दहीभात खाऊन त्या दिवशी नव्याने उमगले. हिंदुस्तानात भाषावार प्रांतरचना स्वातंत्र्यप्राप्तिनंतर झाली असली तरी "भाता-वार" प्रांतरचना जिथल्या तिथल्या खाद्यसंस्कृतीनुसार फार पूर्वीच झालेली आहे. जसे उत्तर हिंदुस्तानात बासमतीची बिर्यानी, मध्य प्रदेशातला मोगऱ्याचा पुलाव, महाराष्ट्रातल्या आंबेमोहोर आणि इंद्रायणीचा साधा वरणभात तर दक्षिणेत सणासुदीला होणारा सोना मसूरी, कोलमचा गोड पोंगल किंवा इडली-डोसा अशी कितीतरी उदाहरणं मिळतील. इंद्रायणीची बिर्यानी किंवा बासमतीचा साधं-वरण-तूप-भात अशी आंतरप्रांतिय जोडपी केवढी विजोड वाटतात. पण दहीभात मात्र अशा जुलमी मर्यादा जुमानत नाही. त्यामुळेच थोड्याफार फरकाने आणि नानाविध नावांनी दहीभात आसिंधु-सिंधु पर्यंत ग्रहण केल्या जातो. उत्तरेत दही चावल, महाराष्ट्रात दहीभात, बंगालमध्ये दोईभात, ओरीसातला पोखालो, गुजरातमधे खट्टी कंकी, कर्नाटकात मोसरन्ना तर तामिळनाडूत थाइर सादम्. तामिळनाडू आणि आंध्रामध्ये तर दहीभात देवळात प्रसाद म्हणूनही वाटला जातो. आंध्रात घरच्यासाठी केलेला पेरुगन्नम, देवाचा प्रसाद म्हणून केला तर दद्दोजनं (दध्योजनम्?) होतो. महाराष्ट्रातही संतांना दहीभाताचे फार अप्रूप. संत भानुदास म्हणतात, अवघ्या सोडियेल्या मोटा। आजिचा दहींकाला गोमटा ॥ घ्या रे घ्या रे दहींभात। आम्हा देतों पंढरीनाथ ॥ कर्नाटकमध्ये मोसरन्नाशिवाय जेवणाला पूर्णविरामच लागत नाही. एखाद्या कोकणस्थानं दही भाताशिवाय आमचं पान हलत नाही असं म्हटलं तर त्याचा शब्दशः अर्थ घ्यावा कारण दहीभात वाढल्याशिवाय ते पान आणि पानावरचा दोघेही हलत नाहीत. दहीभाताचा उगम द्राविडी प्रांतातला असला तरीही तो बनवायला मात्र द्राविडी प्राणायाम करावा लागत नाही. कुठल्याही तांदळाचा मऊसर भात, चांगलं लागलेलं घट्ट दही, फोडणीसाठी मोहरी-कढीलिंब आणि जरासं मीठ इतका आटोपशीर कारभार. कधी थोडी भिजवून मग फोडणीत घातलेली उडदाची डाळही दहीभाताला आणखीनच लज्जत आणते. काही ठिकाणी डाळिंबाचे दाणे पेरून सजवलेला दहीभात पोटाआधी डोळेही सुखावून जातो. पण अमुक वेळी हे खाऊ नये, अमक्यात तमके टाकू नये अशा आयुर्वेदातल्या अनावश्यक सूचनांकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करावं आणि नको तिथे विरजण पडू देऊ नये. परिपूर्ण दहीभात कसा असावा... माझी तर बुआ अगदी साधी आणि सात्विक कल्पना आहे. तांदूळ हा आंबेमोहोर असावा. सकाळीच तापवलेल्या दुधावरची ताजी साय आणि त्याखालचं जरासं घट्ट दूध असावं, पांढऱ्या सटात लावलेलं, न मोड्लेलं कवड्यांचं दही असावं आणि चवीला थोडंसं मीठ. बस्स एवढंच! आणि हो, या पाच शुभ्रधवल घटकांचं हे पंचामृत नवीन ताटात किंवा वेगळ्या भांड्यात कालवायचं. बाकीचं जेऊन झाल्यावर त्याच ताटात दहीभात कालवणारे महाभाग बघितले की माझ्याच पोटात कालवाकालव होते. अशा दहीभाताची तुलना करायचीच झाली तर शुभ्र वस्त्रे परिधान केलेल्या एखाद्या महात्म्याशीच करावी. सत्संगाने सर्व तामसी विचार निवळून जशी मनःशांती मिळेल त्याच पातळीची क्षुधाशांती या दहीभाताने होते. मला तर कधी वाटतं की समुद्र-मंथनातून निघालेलं विष-प्राशन केल्यावर दाह कमी करण्यासाठी महादेवानंही पार्वतीला "अगं जरा वाडगाभर दहीभात कालवून आणतेस का" अशी फर्माईश सोडली असेल. अशा या अमृताशीही पैजा जिंकणाऱ्या दहीभाताच्या घटकांना "व्हाईट पॉयझन" म्हणणाऱ्यांना काय बोलावं?

दरवर्षी आपल्याकडे बाप्पाचे स्वागत मोदकांनी होत असले तरी गौरी विसर्जनाच्या वेळी निरोप मात्र दहीभाताने द्यायची बऱ्याच ठिकाणी प्रथा आहे. त्याला कारणही तसेच असावे. कदाचित म्हणूनच तुकोबा म्हणतात...

उपजोनियां पुढती येऊं। काला खाऊं दहींभात ॥
वैकुंठीं तों ऐसें नाहीं। कवळ कांहीं काल्याचें ॥

म्हणजेच, हा दहीभात खाण्यासाठी आम्ही पुन्हा जन्म घेऊ कारण असा हा मधुर दहीभात स्वर्गातही मिळत नाही.

## संग्रामपूर तालुक्यात ग्रामीण घरकुल योजनांची प्रगती ! केवळ ४६.९० टक्केच पूर्णता; 2017 ते 2025-26 दरम्यानचा प्रगती अहवाल स्पष्ट करतो हप्ता वितरण व अपूर्ण घरकुलांचा वाढता आलेख

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**




संग्रामपूर : संग्रामपूर पंचायत समिती अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, मोदी आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी घरकुल योजना यांची सन 2017 ते 2025-26 या कालावधीतील एकत्रित प्रगती अहवाल नुकताच समोर आला आहे. या अहवालातून उघड होत आहे की, सर्व योजनांतील एकूण उद्दिष्ट घरकुलांची संख्या 16 हजार 718 असून, त्यातील केवळ 46.90 टक्केच घरकुले पूर्ण झाली आहेत. मंजूर घरकुलांची संख्या – 16,077 पहिला हप्ता वितरित लाभार्थी – 12,657 दुसरा हप्ता वितरित लाभार्थी – 1,472 तिसरा हप्ता वितरित लाभार्थी – 8,819 चौथा हप्ता वितरित लाभार्थी – 6,432 एकूण पूर्ण झालेली घरकुले – 7,841 अपूर्ण घरकुले – 8,877 प्रगतीपथावरील घरकुले – 5,692 काम सुरु नसलेली घरकुले – 3,285तालुक्यातील सुमारे निम्म्यापेक्षा अधिक लाभार्थ्यांना अद्याप संपूर्ण हप्ते मिळालेले नाहीत. यामुळे अनेक लाभार्थ्यांची घरे अपूर्ण अवस्थेत असून, काहींची कामे अजून सुरु देखील झालेली नाहीत.स्थानिक पातळी वरील प्रशासनाने वेळोवेळी निर्देश दिले असले तरी काही कारणास्तव घरकुल योजनांची प्रगती संथ आहे. लाभार्थ्यांना संपूर्ण निधी वेळेवर न मिळाल्याने अडचणी वाढल्या आहेत.पंचायत समितीने यापुढे वेगाने कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, अशी मागणी ग्रामस्थां कडून केली जात आहे.

## लम्पी आजाराच्या व्यवस्थापनाकरिता वेळीच करा उपाययोजना; कृषि विज्ञान केंद्राचे आवाहन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

बुलडाणा : जनावरांमध्ये झपाट्याने फैलावत असलेल्या लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता पशुपालकांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणामार्फत जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, पशुपालकांना शिफारशीत उपाययोजना करून या विषाणूजन्य रोगापासून जनावरांचे संरक्षण करण्याचे आवाहन कृषि विज्ञान केंद्राकडून करण्यात येत आहे.

**रोगाचे कारण व प्रसार:**
लम्पी स्किन डिसीज (Lumpy Skin Disease) हा एक विषाणूजन्य चर्मरोग असून, तो कॅप्रीपॉक्स व्हायरसमुळे होतो. रोगाचा प्रसार प्रामुख्याने चावणाऱ्या माश्या, डास, गोचीड, चिलटे यांच्या माध्यमातून, बाधित व निरोगी जनावरांच्या संपर्कातून, नाक - डोळ्यातील स्त्राव, तोंडातील लाळ चाऱ्यावर व पाण्यावर लागल्यास संसर्ग होतो. या रोगाचा सर्व वयोगटातील जनावरांवर परिणाम होतो, मात्र लहान वासरे अधिक प्रभावित होतात. उष्ण आणि दमट हवामानात कीटकांची वाढ अधिक असल्याने पावसाळ्यात प्रादुर्भाव वाढतो.

**लक्षणे :** ताप येणे व दुध उत्पादनात घट, डोळ्यातून पाणी येणे, लसिका ग्रंथीना सूज, त्वचेवर गाठी (१०-५० मिमी व्यासाच्या), मुख्यतः डोके, मान, पायावर, फुफ्फुसदाह, कासदाह, गर्भपात व प्रजनन क्षमतेत घट, पांढऱ्या रक्तपेशींची संख्या कमी होणे या रोगाचे लक्षणे आहे.

**उपचार व घरगुती उपाय :**
प्रतिजैविके, ज्वरनाशक, जीवनसत्त्वे (A व E) व शक्तिवर्धक औषधांचा वापर, त्वचेवरील व्रणांवर फ्लाय रिपेलंट स्प्रे, तोंडातील व्रणासाठी २% पोटॅशियम परम्यांगनेट द्रावण व बोरोग्लीश्रीन.

**घरगुती उपाय:**
१० खायची पाने, १० ग्रॅम मीरे, १० ग्रॅम मीठ यांची पेस्ट करून त्यात गूळ मिसळून जनावरांना द्यावी, पहिल्या दिवशी दर ३ तासांनी, दुसऱ्या दिवशीपासून दिवसातून ३ वेळा १५ दिवसपर्यंत, जखमांमध्ये किडे पडल्यास खोबरेल तेलात कापूर, सीताफळाच्या पानांचा लेप लावावा.

**रोगनियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाय :**
बाधित व निरोगी जनावरांना वेगळे ठेवावे, एकत्रित चारा-पाणी देऊ नये, गोठ्याचे नियमित फवारणीद्वारे निर्जंतुकीकरण (0.0१% डेल्टा मेथ्रीन), पशु वैद्यकीय अधि काऱ्यांच्या मार्गदर्शना खाली लसीकरण करावे, गोठा स्वच्छ ठेवणे, माशा व डास यांचे नियंत्रण करणे अत्यावश्यक आहे. या आजारावर उपाय करण्यापेक्षा प्रतिबंध करणे महत्त्वाचे असून, पशुपालकांनी जवळच्या पशु वैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा आणि नियमित सल्ला घ्यावा. जनावरांचे नुकसान टाळण्यासाठी वेळीच लसीकरण करून घ्या, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी सर्व जनतेशी केले आहे.

## तब्बल 32 वर्षानंतर "कौटुंबिक न्यायालय वकील संघ! छत्रपती संभाजीनगरची" स्थापना; वकील संघ अध्यक्षपदी ॲड.अनंतकुमार पुंजाजी गुंगे तर सचिवपदी - ॲड.वैभव तुकाराम आमले तसेच ॲड.नवनाथ कडुबा सिनगारे यांची उपाध्यक्षपदी निवड

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शंकर डब्बे.**




औरंगाबाद : औरंगाबाद येथे 1993 रोजी कौटुंबिक न्यायालयाची सुरुवात झाली, त्यानंतर 32 वर्षामध्ये माननीय न्यायालयात काम करणाऱ्या वकील बांधवाना तसेच न्यायालयात येणाऱ्या पक्षकारांना व न्यायालयाला न्यायदानामध्ये योग्य प्रकारे मदत मिळण्याबाबत अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.त्यामुळे कौटुंबिक न्यायालय वकील संघ छत्रपती संभाजीनगरची स्थापना करण्या बाबत संस्थापक कार्य कारणी यांच्यामध्ये एक सामूहिक रित्या मीटिंग घेण्यात आली होती. व त्यादृष्टीने वकील संघ स्थापनेबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून माननीय धर्मादाय आयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे अर्जदार - ॲड.वैभव तुकाराम आमले यांनी नोंदणी अर्ज सादर केला होता, सदरील बाबीची पूर्तता व पाठपुरवठा करून नोंदणी करण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली,त्या अनुषंगाने मा.धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालया कडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले असून त्यानुसार पुढील प्रमाणे संस्थापक कार्यकारणी राहील.ॲड.अनंतकुमार पुंजाजी गुंगे(अध्यक्ष) ॲड.वैभव तुकाराम आमले (सचिव) ॲड.नवनाथ कडुबा सिनगारे (उपाध्यक्ष) ॲड. अक्षय परमेश्वर पिसे (सहसचिव) ॲड. सचिन रमेश गजवार (कोषाध्यक्ष) तर सदस्य - ॲड. पुष्पक संतोष काबरा, ॲड. सुभद्रा विनोद समिंद्रे, ॲड. गोपाल गणपत धनगे, ॲड. राहुल गोविंदराव पवार, ॲड. सुकन्या सुकनंदन हांडे तसेच ॲड.कपिल दिनकर गायकवाड हे कार्य कारिणी सदस्य म्हणून वकील संघाची धुरा सांभाळेल. वरील कार्यकरणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे व नवीन वकील संघाचे पदाधिकारी यांनी वकील संघाच्या माध्यमातून कौटुंबिक न्यायालयात येणाऱ्या समाजातील गरीब, वंचित व पीडित यांच्या न्यायासाठी लढणाऱ्या घटकां साठी व न्यायालयात येणाऱ्या पक्षकारांना तसेच न्यायालयात काम करणाऱ्या वकील बांधवाना कामकाजासाठी व त्यांच्या योग्य त्या न्यायहक्कासाठी मदत करत असल्याची ग्वाही सर्व पदाधि काऱ्यानी दिली आहे. मा. अध्यक्ष - ॲड. वसंतराव डी. साळुंखे साहेब ( बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा ) यांनी प्रथम कार्यकारिणी पदाधि काऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## २ बिबट्याच्या झुंजीत गंभीर जखमी बिबट जेरबंद लाखनवाडा खू.बीट मधील धदम शिवारातील घटना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**संदीप राठोड.**




खामगाव : तालुक्यातील लाखन वाडा खु. बीट वन विभागामधील धदम जंगलात बिबट्या ची झुंज झाल्यामुळे गंभीर जखमी झालेल्या बिबट जेरबंद करण्यात आला. वन विभागाच्या लाखन वाडा खू जंगलातील वन्यप्राण्याचा नेहमीच मुक्त संचार असतो. यामध्ये हिंस्त्र प्राण्याचा ही समावेश आहे. अनेक वेळा या भागात बिबट्याचे दर्शन या शिवारातील शेतकऱ्यांना झालेले आहे. १६ जुलै रोजी लाखनवाडा खू शिवारातील शेत असलेल्या काही शेतकऱ्यांना घनदाट जाळीमध्ये बिबट दिसून आला. त्यामुळे या विभागातील शेतकऱ्यां मध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन येथे जाण्यास शेतकरी तयार नव्हता ही माहिती वनपरिक्षेत्रातील अधिकारी चेतन राठोड यांच्या पर्यंत पोहोचली यामुळे वनरक्षक शहानिशा करून रेस्क्यू टीमला पाचरण करावे लागले. या टीमने सदर बिबट्याला बेशुद्ध करून पिंजऱ्यात जेरबंद केले. सदर बिबट्याच्या डोक्याला झुंज करतांना मोठी जखम झाली असल्याचे समजते. पुढील उपचारा साठी बिबट्याला खामगाव वरून नागपूर गोरेवाडा प्राणी संग्रालय रवाना केल आहे. यावेळी वन विभागातील कर्मचारी वनपरिक्षेत्र अधिकारी चेतन राठोड, वनपाल पि के मिसाळकर, वनपाल पी. जी. जाधव, वृक्षाला भागनागरे मॅडम, शिंदे मॅडम, लाखनवाडा बीडचे बीड जमादार आनंद वाघमारे, अमोल राऊत, अहेमद खान व शेतकरी ग्रामस्थाचे सहकार्य मिळाले.










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# यशवंत हायस्कूलमध्ये किशोरवयीन विद्यार्थ्यांना पोलीस विभागातर्फे मार्गदर्शन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत दाभाडे.**



नांदुरा : चांदूर बिस्वा येथील यशवंत हायस्कूल कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात दि. 14 जुलै 2025 रोज सोमवारला किशोर वयीन विद्यार्थ्यांना पोलीस विभागातर्फे मार्गदर्शन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चांदूर बिस्वा शिक्षण समिती चांदुर बिस्वाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पुरस्कार विभूषित मुख्याध्यापक तथा माजी सदस्य महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक अभ्यास मंडळ पुणे मा. श्री. व्ही. आर.पाटील सर हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा.श्री.संजय पवार साहेब सहायक पोलीस निरीक्षक, वडनेर भोलजी तथा चांदुर बिस्वा पोलीस आउटपोस्ट तसेच संस्थेचे सचिव मा. श्री. ॲड. सुजितभाऊ इंगळे व व्यवस्थापक इंजि. मा. श्री. राजेशजी भागवत, मा. श्री. खोन्दील साहेब, पोलीस हेड कॉन्स्टेबल चांदुर बिस्वा, मा. श्री. वेरुळकर साहेब हेड कॉन्स्टेबल, प्राचार्य श्री. जे. एच. राठोड सर व पर्यवेक्षक मा. श्री. डी. एस. कोलते सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. व्ही. आर. पाटील सर यांचे स्वागत श्री. जे. एच. राठोड सर यांनी केले. मा.श्री.संजय पवार साहेब यांचा संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्प देवून संस्थाध्यक्ष मा. श्री. व्ही. आर. पाटील सर यांनी यथोचित सत्कार केला. व्यासपीठा वरील सर्व मान्यवरांचे पुष्पहाराने सत्कार करण्यात आले. मा. श्री. संजय पवार साहेब यांनी शाळा हे आदर्श नागरिक बनविण्या साठीचे संस्कार केंद्र असून सोशल मिडीयाचा वापर लाभदायक व हानिकारक कसा ठरु शकतो, हे उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. तसेच मुलीनी आपल्या आईला आपली सर्वात जवळची मैत्रीण बनवावी व आपल्या सगळ्या अडचणी तिला सांगाव्यात असे विषद केले. अध्यक्षीय भाषणातून मा. श्री. व्ही. आर. पाटील सर यांनी मोबाईलचा वापर व त्याबाबत घ्यायची दक्षता याविषयीचे मार्गदर्शन करुन आपत्कालीन पोलीस क्रमांकाचा वापर कसा व केव्हा करावा हे सांगितले. प्रवास करतांना, गर्दीच्या ठिकाणी, शाळेमध्ये वावरतांना गुड टच व बॅड टच याचे भान ठेवावे. मोबाईलचा वापर केवळ अभ्यासासाठी मर्यादित ठेवावा असे सुतोवाच केले. कार्य क्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. यु. एन. किनगे सर यांनी केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षक, शिक्षिका तसेच कर्मचारी वृंद बहुसंख्येने उपस्थित होते.

# डॉ.विजय चऱ्हाटे साहेब यांना राज्यस्तरीय भिमरत्न पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रकाश सुखधाने.**




बुलढाणा : मेहकर येथील वैद्यकिय क्षेत्रातील देवमाणुस मेहकरचे सुप्रसिध्द डॉ.विजय चऱ्हाटे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्ताने सर्व मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय भिमरत्न पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या व सर्व मित्र परिवाराच्या वतीने अभिष्ट चिंतन सोहळ्याचे मातोश्री हॉस्पिटल मेहकर येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्य क्रमाच्या अध्यक्षस्थानी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई हे होते. यावेळी आपल्या अध्यक्ष भाषणातून तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई म्हणाले डॉक्टर पेशा हा लोकांना जीवदान देणारा असून या पेशामध्ये प्रामाणिकपणा अतिशय महत्त्वाचा असतो. रुग्णांची सेवा हीच ईश्वर सेवा असे मानून आपले सर्वस्व समाज हितासाठी जोपासणारे डॉ.विजय चर-हाटे साहेब वैद्यकीय क्षेत्रातील अनमोल हिरा आहे. त्यांचे आपण जतन केले पाहिजे असे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यत करत साहेबांना वाढदिवस निमित्ताने शुभेच्छा दिल्या..यावेळी, संदिप गवई, दैनिक अखंड झेप चे मुख्य संपादक रविन्द्र वाघ,पत्रकार गजानन सरकटे, अख्तर करेशी, संदिप राऊत, प्रकाश सुखधाने, कुणाल माने, देवानंद वानखेडे, इलीयास कुरेशी, नबी कुरेशी, व मित्रपरिवार उपस्थित होते.

# संग्रामपूर-उमरा रस्त्यावर गट नं.५८ मधील अडथळा शेतकऱ्यांचा तहसीलदारांना निवेदन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**




संग्रामपूर : संग्रामपूर ते उमरा दरम्यान पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या ४ कोटी ५० लाख रुपयांच्या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असतानाच गट क्रमांक ५८ मधून जाणाऱ्या २०० मीटर रस्त्यावर अडथळा निर्माण झाल्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.या संदर्भात संग्रामपूर ते उमरा रस्त्याल गतच्या समस्त शेतकऱ्यांनी तहसीलदार संग्राम पूर यांच्याकडे निवेदन सादर करत रस्त्यावरील अडथळा तातडीने दूर करण्याची मागणी केली आहे. निवेदनातील प्रमुख मुद्दे गट नं. ५८ मधील शेतमालकाकडून शेत रस्त्यावर अडथळा शेतमाल वाहतूक व शेती कामांमध्ये अडचण पावसाळ्या मुळे शेतमालाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता फक्त २०० मीटर रस्ता अपूर्ण – त्यामुळे संपूर्ण रस्ता निष्प्रभ.

**काम झाले ४.३ कि.मी., उरले फक्त २०० मीटर!**

संग्रामपूर ते उमरा या ४.५ किमीच्या रस्त्याचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून, केवळ गट नंबर ५८ मधून जाणारा २०० मीटरचा रस्ता एका शेतमाल काच्या विरोधामुळे रखडलेला आहे. या अडथळ्यामुळे शेतकरी पेरणीसाठी शेतात पोहोचू शकत नाहीत, तसेच शेतमालाचे वाहतूकही थांबली आहे.

**तत्काळ हस्तक्षेपाची मागणी!**

शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे घटनास्थळी पाहणी करून योग्य तो निर्णय घेण्याची विनंती केली आहे. यासोबतच त्यांनी उपविभागीय अधिकारी जळगांव जामोद, जिल्हाधिकारी बुलढाणा, महसूल मंत्री व कृषी मंत्री यांनाही निवेदनाची प्रत पाठवली आहे.

**शेतकऱ्यांची स्वाक्षरीत मागणी!**

रोज सादार शेखजी शेखखितार, नारायण हालेकर, देवीदास बोमाखेडे, विलास विहाय यांसह अनेक शेतकऱ्यांनी या निवेदनावर स्वाक्षऱ्या करून "आमचा रस्ता मोकळा करा, अन्याय थांबवा" असा आवाज बुलंद केला आहे.

# स्मिता पाटील विद्यालयास रोटरी क्लब यांच्याद्वारे शालेय क्रीडा साहित्य प्रदान व गुणवंत विद्यार्थी बक्षीस सोहळा संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**सचिन म्हसे.**




पुणे : वारजे माळवाडी येथील स्मिता पाटील विद्यालयात रोटरी क्लब ऑफ वारजे यांच्याद्वारे दिलेल्या शालेय क्रीडा साहित्य प्रदान आणि देणगीदाते मुत्तुरामन व धनंजय काळे यांनी दिलेल्या आर्थिक निधीतून रोटरी क्लब शिष्यवृत्ती शुभारंभ सोहळा संपन्न झाला. रोटरी क्लब ऑफ वारजे यांच्या वतीने स्मिता पाटील विद्यालयास बॅडमिंटन रॅकेट, क्रिकेट सेट, फूट बॉल, वॉली बॉल, वजन काटा, थ्रो बॉल, कॅरम बोर्ड, चेस बोर्ड, डॉज बॉल, हाइट स्केल इत्यादी क्रीडा साहित्य प्रदान करण्यात आले. तसेच देणगीदाते मुत्तुरामन व धनंजय काळे यांनी दिलेल्या आर्थिक निधीतून रोटरी क्लब शिष्यवृत्ती शुभारंभ करीत शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ वर्षातील इयत्ता सातवी, इयत्ता आठवी व इयत्ता नववीतील गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय ६ विद्यार्थी व ६ विद्यार्थिनी अशा एकूण १२ विद्यार्थ्यांना शिष्य वृत्तीच्या प्रथम वर्षात बक्षीस म्हणून रोख रक्कम व मेडल देऊन गौरवांकित करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ वारजेच्या अध्यक्षा डॉ. मोनिका आपटे यांनी " स्मिता पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कुस्ती या खेळ प्रकारात राष्ट्रीय पातळीवर विद्यालयाचे प्रतिनिधित्व केले आहे, ही फारच अभिमानाची गोष्ट आहे." असे प्रतिपादन केले. तर शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा संजीवनी पाटील यांनी " इयत्ता दहावी फेब्रुवारी - मार्च परीक्षा २०२५ चा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयात नेहमीच गुणवत्ता पूर्ण शिक्षण दिले जाते." असे प्रतिपादन केले. ड्रीम इंडिया स्कूलच्या संचालिका संस्कृती पाटील यांनी रोटरी क्लब शिष्यवृत्ती प्रथम वर्षातील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन माध्यमिक विभागातील व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले होते. या वेळी रोटरी क्लब ऑफ पुणे वारजेच्या अध्यक्षा डॉ. मोनिका आपटे, युथ डायरेक्टर सचिन म्हसे, रोटेरियन संगीता सुतार, शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा संजीवनी पाटील, ड्रीम इंडिया स्कूलच्या संचालिका संस्कृती पाटील, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक के. जी. पाटील, संतोष बळवंत, नंदिनी उगले व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक के. जी. पाटील व नंदिनी उगले यांनी आभार प्रदर्शन केले.

# पातुर्डा बु येथे जुगार अड्ड्यावर धाड सहा आरोपी अटकेत, एक लाखाहून अधिक मुद्देमाल जप्त!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**




संग्रामपूर : संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा बु येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर तामगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने दिनांक चौदाशे जुलै दोन हजार पंचवीस रोजी दुपारी सुमारास छापा टाकून सहा जणांविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करत अटक केली असून, एकूण एक लाख चार हजार चारशे साठ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणात पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रमोद मुळे (ब. नं. ४५१) यांच्या फिर्यादी वरून गुन्हा रजिस्टर क्र. २५२/२०२५, कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास त्यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

**जुगार खेळताना अटक करण्यात आलेले आरोपी पुढील प्रमाणे!**

१. किसन शरद देशमुख (वय अठ्ठेचाळीस वर्ष)२. फीरोज खान सरोज खान (वय बत्तीस वर्ष)३. प्रमोद सिद्धार्थ वानखडे (वय छत्तीस वर्ष)४. शेख अयाज शेख कमाल (वय त्रेचाळीस वर्ष)५. फीरोज खान मोबीन खान (वय चाळीस वर्ष) सर्व आरोपी पातुर्डा बु, ता. संग्रामपूर येथील रहिवासी आहेत.

**जप्त मुद्देमालाचा तपशील पुढील प्रमाणे आहे!**

आरोपींच्या ताब्यातून मिळालेली नगदी रक्कम एकूण सहा हजार चारशे चाळीस रुपये. घटनास्थळी डावावर सापडलेली नगदी रक्कम दोन हजार एकशे साठ रुपये. एकूण रोख रक्कम – आठ हजार सहाशे रुपये. दोन मोटारसायकली – एक होंडा शाइन अंदाजे किंमत साठ हजार रुपये, दुसरी हीरो होंडा स्प्लेंडर अंदाजे किंमत तीस हजार रुपये, एकूण दोन्हीची किंमत नव्वद हजार रुपये. दोन मोबाईल फोन – अंदाजे किंमत सात हजार रुपये. एक जुनी चटई – शंभर रुपये, एक पाण्याचा कॅन – दोनशे रुपये. नवीन तासपत्त्यांची बारा पाकिटे प्रत्येकी साठ रुपये, एकूण सातशे वीस रुपये. ५२ तासपत्त्यांचा वापर झालेला जुना संच – मूल्य शून्यया कारवाईत पोलिसांनी एकूण एक लाख चार हजार चारशे साठ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.या धाडीत पोलिसांनी घटनास्थळी पंचासमक्ष कारवाई केली असून, जुगार खेळताना आरोपी रंगेहाथ आढळले. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शना खाली ही धाडसत्र राबवण्यात आली.या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, स्थानिक नागरिकांतून पोलिसांच्या या कृतीचे स्वागत होत आहे. पुढील तपास तामगाव पोलीस करीत आहेत.

# वातावरण टाइट असताना पिंजर ठाणेदार अचानक पाच दिवसाच्या सुट्टीवर ? गावात चर्चेला उत!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**




बार्शीटाकळी : अकोला जिल्ह्यातील पिंजर पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कॉन्स्टेबल कुणाल डोंगरे या नशाखोर पोलीसा विरुद्ध गावकऱ्यांनी एसपी कडे तक्रार दाखल केली, गेल्या चार-पाच दिवसापासून पिंजर शहरातील वातावरण टाइट असतानाही पिंजरचे ठाणेदार अचानक पाच दिवसाच्या सुट्टीवर गेले कसे? याबाबत गावात उलट सुलट चर्चा सुरु आहे, याबाबत आमच्या प्रतिनिधींनी ठाणेदार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी आपण पाच दिवसाच्या सुट्टीवर असल्याचे सांगितले,पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांचे पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी कर्तव्यावर असताना बिनधास्त नशा करतात, आणि गावातील लोकांना धमकावणे ,पैसे मागणे, पैसे नाही दिले तर ,खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देणे, पोलिसांकडून जनतेला संरक्षण मिळण्या ऐवजी पोलिसांकडूनच कायदा व सुव्यवस्थेचा भंग केल्या जातो, लोकांशी जाणून बुजून वाद निर्माण करणाऱ्या पिंजर पोलीस कुणाल डोंगरे यांची विरुद्ध लोकांच्या बहुतांश तक्रारी आहेत, गेल्या तीन दिवसांपूर्वी कुणाल डोंगरे या पोलिसाच्या विरोधात जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे गावकऱ्यांनी लेखी तक्रार केली, या पोलिसाला ठाणेदार गंगाधर दराडे यांचे पाठबळ असल्याची चर्चा मात्र शहरात सुरु आहे, गौण खनिज रात्री वाहतूक होत असताना, हे बहाद्दर ठाणेदार या नशाखोर पोलिसाला सरकारी पोलिसाची गाडी देऊन बेकायदेशीर हप्ते वसुली करण्याचे सांगत असल्याची चर्चा गावात सुरु आहे, पिंजर शहरात नशाखोर पोलिसाबाबत संतप्त असे वातावरण निर्माण झाले आहे, त्यामुळे जिल्हा पोलीस प्रमुखांनी नशाखोर पोलिसाला पाठबळ देणाऱ्या ठाणेदार गंगाधर दराडे आणि पोलीस कॉन्स्टेबल कुणाल डोंगरे यांची विरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची मागणी शहरातून केली जात आहे, अत्यंत प्रामाणिक आणि शिस्तबद्ध असलेले जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यावर काय निर्णय देतात ,हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल, दरम्यान, ठाणेदार गंगाधर दराडे हे 17 जुलैपासून अचानकच पाच दिवसाच्या सुट्टीवर गेल्यामुळे गावात उलट सुलट चर्चा आहे,

# बँक अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शेतकरी बेपत्ता; आत्मदहनाच्या इशाऱ्यानंतरही ठोस कारवाई नाही

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुध्दोधन खंदारे.**

मंठा : मंठा तालुक्यातील बँकेच्या अपमानास्पद वागणुकीला कंटाळून आत्मदहनाचा इशारा दिलेल्या शेतकरी वसंत सरोदे यांचा ८ जुलैपासून ठावठिकाणा लागलेला नाही. ग्रामस्थांत त्याबाबत तीव्र चिंता निर्माण झाली असून, संबंधित बँक अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

**प्रकरण काय आहे?**

१ जुलै रोजी तळणी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत कर्जासाठी गेलेल्या उस्वद (ता. मंठा) येथील शेतकरी वसंत सरोदे यांना बँक शाखाधिकारी भाग्यश्री केडिया यांनी अपमानास्पद शब्दात बोलावल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. या मानसिक धक्क्यामुळे सरोदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे १ आणि ४ जुलै रोजी व बँकेच्या वरिष्ठांकडे ६ जूलै रोजी लेखी तक्रारी दिल्या. मात्र, १० जुलै रोजी आत्मदहनाचा इशारा देत ते बेपत्ता झाले. ८ ते १७ जुलै दरम्यान त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही.गावकऱ्यांचा रोष; वरिष्ठांची मनधरणी ...१६ जुलै रोजी उस्वद गावचे सरपंच संतोष सरोदे यांच्यासह ग्रामस्थांनी जालना येथील बँक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. “त्या अधिकाऱ्यावर कारवाई कधी होणार?” असा थेट सवाल ग्रामस्थांनी केला. मात्र, वरिष्ठांनी मनधरणीचे धोरण घेत अप्रत्यक्षपणे त्या अधिकाऱ्याची पाठराखण केली, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**पुन्हा एक शेतकरी आत्मदहनाच्या तयारीत!**

या घटनेनंतर आणखी एका शेतकऱ्याने आत्मदहनाचा इशारा दिला आहे. खोरवड (ता. मंठा) येथील शेतकरी बालासाहेब अमृतसागर यांनी बँक शाखाधिकारी केडिया यांचा मनमानी कारभार, खोट्या तक्रारी व सक्तीच्या वसुलीचा आरोप करत मुख्यमंत्री फडणवीस आणि विभागीय आयुक्त यांच्याकडे ईमेलद्वारे तक्रार केली आहे. १५ ऑगस्ट रोजी आत्मदहन करणार असा गंभीर इशारा त्यांनी दिला आहे.

**गंभीर तक्रारी असूनही वरदहस्त?**

भाग्यश्री केडिया यांच्याविरुद्धः खातेदारांचे बचत खाते होल्ड करणेघरी जाऊन सक्तीने वसुली करणेखोट्या पोलिस तक्रारी करणेया गंभीर तक्रारी असूनही, वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होत असल्यामुळे वरिष्ठ अधिकारी डोळेझाक करत असल्याचा आरोप तालुका संघटक ज्ञानेश्वर माऊली सरकटे यांनी केला आहे.

**शेतकऱ्यांचा सवाल – न्याय कधी?**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना केवळ आकडेवारीच्या वसुलीच्या चौकटीत पाहिले जात आहे का? असा सवाल निर्माण झाला असून, दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत शेतकऱ्यांचा रोष कायम राहणार, हे स्पष्ट दिसत आहे.

# शेतकरी, ग्रामीण व औद्योगिक प्रश्नांवर आक्रमक

## आमदार सिद्धार्थ खरात यांचा विधानसभेत सत्ताधाऱ्यांना जोरदार हिसका



**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

मेहकर : राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, ग्रामीण भागाचा अक्षम्य विकास, आणि औद्योगिक व पर्यटन क्षेत्रातील दुर्लक्ष या मुद्द्यांवर शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधान सभेत सरकारवर जोरदार टीका केली. 293 क्रमांकाच्या प्रस्तावावर भाषण करताना त्यांनी सत्ताधाऱ्यांना जाब विचारला आणि सरकारच्या फसव्या घोषणांचा पर्दाफाश केला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारवर भाषणबाजीचा आरोप करत अत्यंत मार्मिक शब्दात विचार मांडला ."कोऱ्या कागदावर शाईनं काळं करणं सोपं आहे, पण मातीला हिरवं करणं कठीण आहे. जर भाषणांनी शेतकरी सुखी होत असेल, तर आज आत्महत्या करण्याची वेळच आली नसती! " असेही ते बोलले.

### शेतकरी आत्महत्या आणि हमीभावाचा मुद्दा

**आमदार सिद्धार्थ खरात यांनी आपल्या भाषणाची सुरुवात शेतकऱ्यांच्या प्रश्नांपासून केली. सरकारने दिलेले हमीभाव, कर्जमाफी आणि उत्पन्न दुप्पट करण्याची आश्वासने पूर्णपणे फोल ठरल्याचा आरोप त्यांनी केला."शेतकऱ्यांना काय मिळालं? ना हमीभाव, ना कर्जमाफी, ना उत्पन्नात वाढ... तरीही मंत्र्यांच्या तोंडून विकासाच्या गप्पा चालू आहेत!" असा सणसणीत सवाल त्यांनी केला.ते पुढे म्हणाले, "जानेवारी ते जून 2025 या कालावधीत तब्बल 1267 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. जर सरकारमुळे आनंद वाढला असता, तर हे शेतकरी आत्महत्या का करत आहेत?"**

### औद्योगिक मागासलेपण आणि एमआयडीसीचा प्रश्न

**औद्योगिक विकासाच्या मुद्द्यावरही आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरकारला धारेवर धरले."महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांपैकी फक्त 9 जिल्हे खऱ्या अर्थाने विकसित आहेत. उरलेले 27 जिल्हे अजूनही मागास असून, त्यापैकी 12 जिल्हे अतीमागास आहेत, याकडे सरकारचं दुर्लक्ष होत आहे."मेहकरमध्ये 1989 मध्ये सुरू झालेली एमआयडीसी अतिक्रमणात गेली, आणि आजही त्या भागात एकही मोठा उद्योग नाही, असे ते म्हणाले. नवीन उद्योग स्थापनेसाठी 300 एकर अतिरिक्त जागेची मागणी त्यांनी सभागृहात केली."आम्हाला शेतीवर आधारित उद्योग हवेत. त्यासाठी स्वतंत्र अधिकारी आणि सुविधा देणे सरकारचे कर्तव्य आहे."**

### लोणार सरोवर पर्यटनाची दुरवस्था

**आ.खरात यांनी लोणारच्या पर्यटन विकासावरही भाष्य करत एक महत्त्वाचा मुद्दा मांडला."५२,००० वर्षांपूर्वी उल्कापात झालेलं जागतिक महत्त्वाचं लोणार सरोवर हे आज बकाल अवस्थेत आहे."वनविभाग, पर्यटन आणि पुरातत्व विभाग यांच्या समन्वय अभावामुळे लोणारचा विकास अडकल्याचे त्यांनी स्पष्ट केले."लोणावळ्यासारखं लोणार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी मी लोकांना वचन दिलं होतं. पण या ठिकाणी स्थापन केलेल्या समितीत लोकप्रतिनिधीच नाहीत! हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना हरताळ फासणं आहे."असा आरोप त्यांनी केला.**

# घाटबोरी येथे भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास प्रारंभ

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अंकोश राठोड.**



घाटबोरी : घाटबोरी येथे भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास प्रारंभ. आषढी पोर्णीमा पासून महाप्रजापती महीला उपासिका संघ च्या वतीने बुद्ध विहारामध्ये भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास वश्रवनास सुरुवात करण्यात आली सर्व प्रथम भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर त्रिशरण पंचशील व बुद्ध पुजा पाठ करून वाचण्यास सुरुवात करण्यात आली ग्रंथ वाचक शेषराव अंभोरे करत आहेत या ग्रंथाचे श्रवण करण्यासाठी गावातील असंख्य उपासक व उपासिका उपस्थित होते

# साखरखेर्डा परिसरात अनेक गावात हुमणी अळीच्या प्रादुर्भावाने शेतकरी संकटात; सोयाबीन पिक धोक्यात

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



साखरखेर्डा : साखरखेर्डा परिसरात येत सवडद मोहाडी , शिंदी ,रताळी गावातील शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत असून खरीप हंगाम वाया जाण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.साखरखेर्डा परिसरातील अनेक शेतकऱ्यांची पिके धोक्यात आल्यामुळे शेतकरी डोक्याला हात लावून बसत आहे.सततच्या बदलत्या हवामानामुळे,उन्हाळ्यात पडणारा अवकाळी पाऊस यामुळे हुमणी या किडीचा प्रादुर्भाव मागील दोन वर्ष पासून वाढत आहे.परिणामी प्रामुख्याने पीक उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट आढळून येते. ही कीड पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. महाराष्ट्रात प्रामुख्याने सोयाबीन,कापूस,उडीद या पिकांवर मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. हुमणी अळीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने उडीद सोयाबीन पिकावर पाहायला मिळत असून हुमणी अळी जमिनीत राहत असून पिकाचे मूळ खात असल्यामुळे झाड सुकली जाऊन ते झाड नष्ट होत आहे . परिसरातील शेतात मोठ्या प्रमाणात हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. हुमणी अळी ही जमिनीखाली राहत असल्याने त्यांना नियंत्रण करणे अधिक अवघड झाले आहे.याबाबत कृषी विभागाने मार्गदर्शन करावे अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तेजराव बापू देशमुख यांनी केली आहे.

# मध्यवर्ती बस स्थानकासमोरील अंदरपास मध्ये पाण्यामध्ये बुडून एकाचा मृत्यू!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**जुनेद अली.**



अकोला : शहरातील मध्यवर्ती बस स्थानकासमोरील अंडरपास मध्ये मिळाला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह. शहरातील मध्यवर्ती बस स्थानकासमोरील अंडरपास मध्ये बारामहा पाणी साचलेले असते. हा गुरुवार रोजी पहाटेच्या सुमारास या अंडर पास मध्ये एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसतात एकच धावपळ उडाली घटनेची माहिती मिळतात सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. अद्याप मृत देहाची ओळख पटली नसून हा घातपात आहे की आणखी काही याचा तपास सिटी कोतवाली पोलीस करीत आहेत. प्राप्त माहितीनुसार सदर अंडर पास मध्ये महानगरपालिकेतील अग्नि शामक विभाग हा सदर अंडरपास मधील सोमवार दिनांक 14 जुलै रोजी पाणी काढण्यास गेला असता बाजूला असलेल्या वस्तीधारकांनी अग्निशामक विभागाला पाणी काढण्यास मनाई केली होती. कारण हे पाणी काढल्यास संबंधित वस्तीमध्ये चिखल निर्माण होतो म्हणून सदर कर्मचाऱ्यांना अश्लील शिवीगाळ तसेच मारहाणीच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. त्यामुळे महानगरपालिकेतील अग्नि शामक विभाग हा तेथून पाणी न काढता परत चालला आला होता. अग्नि शामक विभागातील कर्मचाऱ्यांनी संबंधित घडलेला प्रकार हा वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुद्धा सांगितला होता मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज या व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याचीही बोलले जात आहे. विशेष म्हणजे या अंडर पास मध्ये दीड ते पावणेदोन लक्ष रुपयाचा पंप बसवण्यात आला होता तो सुद्धा चोरीला गेला असून याविषयी संबंधित कंपनीने तसेच अधिकाऱ्यांनी पंप चोरीला गेल्याची तक्रार सुद्धा पोलीस स्टेशनला केली नसल्याचे बोलले जात आहे. तसेच या अंडर पास मधील लोखंडी जाळ्या तसेच लाईट चोरून नेल्या जात आहेत. सदर अंडर पास मध्ये पाणी नसल्यावर रात्री बे रात्री लूटमारीच्या घटना सुद्धा घडले असून अंडरपास सामान्य नागरिकांसाठी जीवघेणा ठरला आहे.

# गणेशराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त किनगाव राजा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न



**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान देशमुख.**

सिंदखेडराजा : लोकशिक्षण संस्थेचे सचिव तथा जिजामाता ग्रीन एनर्जीचे उपाध्यक्ष गणेशराव राजे जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्र द्वारा संचलित जिजामाता नेत्रालय तथा सारथ्य फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले. सदरील शिबिरामध्ये मोफत नेत्र तपासणी, मोफत औषधोपचार तथा शिबिरामध्ये निवड करण्यात आलेल्या रुग्णांची अल्प दरात शस्त्रक्रिया करण्यात येणार असून सदरील शिबिरांमध्ये २०० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली यावेळी जिजामाता हॉस्पिटलचे समाधान देशमुख, अमेर बागवान, बाळासाहेब कठोरे, राजु लोखंडे, सचिन जाधव, विठ्ठल झगरे तथा सारथ्य फाउंडेशनचे गोपाल देवकर यांच्या सह गावकरी मंडळी उपस्थित होते.

# मिलिंद रामटेके बोरीअरब कृषी बाजार समिती संचालक पदी नियुक्तीयांची नियुक्ती


**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**



दारव्हा : कृषी उत्पन्न बाजार समिती बोरी अरब चे संचालक श्री मिलिंद तुळशीराम रामटेके यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या आदेशाने राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे यांनी ही नियुक्ती केली. मिलिंद रामटेके कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बोरीचे संचालक असून त्यांनी या नियुक्तीचे श्रेय राज्यमंत्री इंद्राणील नाईक, वसंतराव घुईखेडकर, जिल्हाध्यक्ष श्री कामारकर यांना दिले आहे.

# 22 जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करावा - नितीन जाधव गोगलगावकर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**



परभणी : गौरक्षक सेना परभणी महाराष्ट्र राज्य प्रणित राष्ट्र जन प्राणिमित्र गोसंवर्धन अभियान फाउंडेशन परभणीच्या वतीने महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने महायुती च्या काळामध्ये गो सेवकांची गोपालकांची अनेक दिवसाची मागणी या महाराष्ट्र शासनाने केलेले आहे ती म्हणजे कोणती तर येणारी 22 जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करण्याचे आव्हान केलेले आहे त्याच आव्हानाला प्रतिसाद म्हणून महाराष्ट्रातल्या एक ते दीड गोशाळा व हजारो गोसेवक गो पालक गो संचालक गोभक्त गोप प्रेमी शेतकरी बांधवांना प्रत्येक व्यक्तीने आपापल्या परिसरामध्ये प्रत्येक नगरात प्रत्येक वार्डामध्ये प्रत्येक गावामध्ये प्रत्येक खेड्यामध्ये गोमातेचे गोपूजन करावे व गो वृक्ष लागवड करावी गोमातेच्या गो संवर्धन सेवा करण्याची संकल्पना प्रत्येक व्यक्तीने घेतली पाहिजे म्हणून येणारी 22 जुलै हा प्राणी फक्त गोसंवर्धन दिन उसात साजरा करावे अशी आव्हान गौरक्षक सेना परभणी महाराष्ट्र राज्य जनसंपर्क मंत्री तथा परभणी जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्या पुढाकारातून विविध माध्यमातून जनजागृतीच्या मीडियाच्या माध्यमातून प्रतिसाद प्रसिद्धी करण्यात येत आहे जास्त गोभक्तांनी गो पूजन व संवर्धन दिन उत्साहात साजरा करावे ही नम्र विनंती व आव्हान राष्ट्र जन प्राणी मित्र गो संवर्धन अभियान फाउंडेशन परभणी महाराष्ट्र राज्य मुख्य संयोजक राष्ट्रीय गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर , गो कथा कीर्तनकार ह भ प रमेश महाराज मोरे देवगावकर गौरक्षक सेना परभणी वरिष्ठ उपाध्यक्ष देवतवाल चंपालाल, गौरक्षक सेना हिंगोली जिल्हाध्यक्ष बन्सी चव्हाण कळमनुरीकर गौरक्षक सेना पुणे जिल्हाध्यक्ष विजय सिंह नागपूर जिल्हाध्यक्ष विशाल पडोळे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष नारायणराव खामनकर जालना जिल्हाध्यक्ष श्रीरंग धुमाळ गौरक्षक सेना पाथरी विधानसभा प्रमुख श्रीनिवास राठोड गंगाखेड विधानसभा गजानन पोळ नामदेव चापके सुनील अवचार गौरक्षक सेना महाराष्ट्रातले सर्व पदाधिकारी यांच्यासह च्या वतीने आव्हान केले आहे अशी माहिती गौरक्षक सेना महाराष्ट्र जनसंपर्क संघटन मुख्य मंत्री राष्ट्रीय गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार माहिती दिली.

# काँग्रेसच्या वतीने गजानन महाराज पालखी च्या मुख्य मार्गावर रस्त्याची डागडूगी करावी; नगरपरिषद व सा.बांधकाम विभाला निवेदन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**संदीप राठोड.**




खामगाव : श्री संत गजानन महाराज पालखीचे खामगांव येथे प्रस्थान होत आहे. शहरतील रस्ते व साफसफाई पाहता नगरपालिकेने त्वरित करावी असे निवेदन आज काँग्रेसच्या वतीने नगरपालिकेला देण्यात आले. तसेच एक निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले असून शेगाव कडे प्रस्थान होण्या पुर्वी पर्यायी मार्गाची म्हणजे शेलोडी, तिंत्रव, जवळा, या मार्गाची डागडुजी करण्या बाबत.तसेच पालखी च्या मुख्य मार्गावर ठीक ठिकाणी महीलान करिता फिरते शोचालय व टॉयलेट ची व्यवस्था करण्यात यावी अशी निवेदन देण्यात आले. यावेळी स्वप्निल संजय ठाकरे शहर अध्यक्ष व किशोर बाबासाहेब भोसले कार्याध्यक्ष खामगांव शहर काँग्रेस कमिटी खामगांव आदींची उपस्थिती होती. या निवेदनात नमूद आहे की दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा श्री संत गजानन महाराजांची पालखी खामगाव शहरात येणार आहे. आपल्या शेगाव येथील श्री संत गजनान महाराज संस्थांनच्या पालखीने परतीच्या प्रवासाला सुरुवात केली असुन ह्या पालखीचे आपल्या खामगांव शहरात दिनांक 30 जुलै 2025 वार बुधवार रोजी आगमन होणार आहे.खामगांव येथे एक दिवसाचा मुक्काम करुण ही पालखी दुसऱ्या दिवशी शेगाव कडे प्रस्थान करणार असुन या वेळेस पालखी सोबत लाखो भाविक शेगाव कडे मुख्य मार्गाने जात असतात या मुळे मुख्य रस्ता पूर्णतः बंद झाल्याने बऱ्याच मोठ्या प्रमाणात भाविक शेगाव कडे जाणाऱ्या पर्यायी मार्गाचा म्हणजे शेलोडी, तींत्रव, जवळा या मार्गाचा वापर करित असतात अश्या वेळेस आपण या पर्यायी मार्गाच्या रस्त्यांची परिस्थीती पाहिल्यास ह्या रस्त्यांची पार दुरवस्था झालेली असुन या रस्त्यात ठीक ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडुन त्यात पाणी साचुन कुठे डबके तर कुठे चिखल निर्माण झालेला आहे.या मुळे दर्शनास जाणाऱ्या व दर्शन करुण येणाऱ्या भक्तांना खुप त्रास होईल हा त्रास दुर करण्या करिता शेलोडी, तींत्रव, जवळा, शेगाव कडे जाणाऱ्या या पर्यायी मार्गाची तत्काळ डागडुजी करण्यात यावी तसेच शेगाव कडे जाणाऱ्या पालखीच्या मुख्य मार्गावर ठीक ठिकाणी महीलान करिता फिरते शौचालय व टॉयलेटची व्यवस्था करण्यात यावी.तरी आपण अमच्या या मागणीचा सहानुभूती पूर्वक विचार करून योग्य ती कार्यवाही करावी.

# ऑपरेशन प्रहार अंतर्गत जिल्ह्यात पाठोपाठ कारवाया; पिंजर पोलिसांच्या कारवाया का नाहीत? वरिष्ठासाठी संशोधनाचा विषय

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**

बार्शीटाकळी : शिस्तप्रिय जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांच्या ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्वच पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याबाबत पाठोपाठ कारवाया केल्या जात आहेत, मग पिंजर पोलिसांकडून पाठोपाठ कारवाई का केल्या जात नाही? हा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यासाठी एक संशोधनाचा विषय आहे, ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत विविध प्रकारच्या अवैध धंद्याविरुद्ध पाठोपाठ कारवाई, सुरू आहेत, मुर्तीजापुर बाळापुर बार्शीटाकळी, अकोट तेल्हारा, तसेच जिल्ह्यातील सी क्लासच्या पोलीस स्टेशन कडून देखील मोठ्या कारवाया होताना दिसत आहे, परंतु पिंजरचे ठाणेदार यांनी आजपर्यंत मोठी कारवाई केली नसल्याचे चित्र दिसत आहे, त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याचे गांभीर्य घेणे गरजेचे आहे, असे ग्रामीण भागातील नागरिक बोलत आहेत,जेव्हापासून अकोल्याला आयपीएस अधिकारी अर्जित चांडक साहेब लाभले तेव्हापासून जिल्ह्यातील वातावरण टाइट झाले आहे, सर्वच अवैध धंद्याविरुद्ध ऑपरेशन प्रहार अंतर्गत विविध अवैध धंद्या विरुद्ध पाठोपाठ कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट चित्र आहे, परंतु अद्याप पर्यंत पिंजर पोलिसाकडून एखादी मोठी कारवाई झाली नसल्याचे दिसत आहे, जिल्हा पोलीस दल जिल्ह्यातील अवैध धंदे खपवून घ्यायला तयार नाही, जागोजागी कायद्याचे पालन केल्या जात आहे, परंतु, पिंजर पोलिसांकडून काही ठोस कारवाया दिसत नाहीत, त्यामुळे पोलीस कारवाईचे घोडे कुठे अडले? हेच समजत नाही, अवैध व्यावसायिक आपल्या परीने चोरून लपून धंदे करीत असल्याची चर्चा आहे, मग पिंजर पोलिसांनी आपल्या डोळ्यावर पट्टी बांधलेली आहे का? असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जातो, कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पिंजर पोलिसांना अपयश आल्याचे दिसत आहे, अनेक चोरींचा अजूनही तपास लागला नाही, तो का लागला नाही, याची माहिती वरिष्ठ पोलीस यंत्रणांनी घ्यावी, अशी सुद्धा मागणी केल्या जात आहे, एपीआय गंगाधर दराडे यांचे कार्यकाळात एखादी कोणती मोठी कारवाई झाल्याचे या दीड वर्षात ही दिसत नाही, त्यामुळे पिंजर पोलिसाकडून कारवाया का केल्या जात नाहीत?,हा ही एक मोठा संशोधनाचा विषय आहे, पिंजर ते ठाणेदार दराडे यांचे नशेखोर पोलिसांना पाठबळ असल्याची सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चा आहे, ठाणेदार जर कर्तव्यावर असताना नशेखोर पोलिसांना पाठबळ देत असेल तर ,मग बाकीचा विचार तुम्ही करावा, असे लोकांचे म्हणणे आहे, गावात कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी पोलिसांनी आपले कर्तव्य बजावणी आवश्यक आहे, कर्तव्य प्रामाणिकपणे बजावण्या ऐवजी पाठबळ दिल्या जात असल्याची खमंग चर्चा आहे, त्यामुळे पिंजर पोलिसांचीच, ऑपरेशन प्रहार अंतर्गत चौकशी व्हावी, असे लोकांचे म्हणणे आहे.